महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांकः-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/मा.तं. दिनांकः- २४ ऑगस्ट, २०२२

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषयः-जाहिरात क्रमांक १०/२०२० विमा उपसंचालक, सामान्य राज्य सेवा, गट-अ, कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत**

**संदर्भः- (१) शुध्दीपत्रक क्र. डीआरए-०५२१/सी.आर.१९/२०२१/जाहिरात, दिनांक ०६ डिसेंबर, २०२१**
**(२) प्रसिध्दीपत्रक क्र. डीआरए-०५२१/सी.आर.१९/२०२१/जाहिरात, दिनांक ११ ऑगस्ट, २०२२**

विमा उपसंचालक, सामान्य राज्य सेवा गट-अ संवर्गातील पदाकरीता दिनांक ५ ऑगस्ट, २०२० रोजी प्रसिध्द जाहिरातीस अनुसरुन अर्ज केलेल्या उमेदवारांना कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी संदर्भिय दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी २३:५९ वाजेपर्यत मुदत देण्यात आली होती. तथापि, प्रशासकीय कारणास्तव प्रस्तुत पदासाठी अर्ज केलेल्या व संदर्भिय दिनांक ११ ऑगस्ट २०२२ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकास अनुसरुन कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर न केलेल्या उमेदवारांना कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करण्याकरीता **दिनांक २६ ऑगस्ट,२०२२ रोजी २३:५९ वाजेपर्यंत** मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करण्याची सुविधा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ‘ONLINE FACILITIES’ अंतर्गत ‘Certificate Upload’ या मेनूद्वारे उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

३. उमेदवारांनी संदर्भिय दिनांक ०६ डिसेंबर, २०२१ रोजीच्या शुध्दीपत्रकातील परिच्छेद ३.१ मध्ये नमूद केल्यानुसार कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर न केल्यास अशा उमेदवारांचा प्रस्तुत निवडप्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

ठिकाणः- मुंबई

सहसचिव (माहिती तंत्रज्ञान)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई